५२८ 36

क्रमांक : एलसीएस-२६०७/६६४/प्र.क्र. १६१/ज-३
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : १८ मार्च, २०१०

MAR 2010
4441

104/2513

विषय :- जमीन- मुंबई उपनगर जिल्हा
मौजे मुलुंड, ता. कुर्ला, नभूक्र ६७६/अ व ६७६/३, क्षेत्र १७०८ चौ. मी.
( शिधावाटप कार्यालयाच्या ताब्यात असलेल्या ८५८ चौ. मी. क्षेत्रासह)
वितरणासाठी उपलब्ध असलेला भूखंड आदित्य सहकारी गृहनिर्माण संस्था
(नियोजित) या संस्थेस अतिमरित्या मंजूर करणे बाबत...

**ज्ञापन :-**

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना वरील विषयाबाबतच्या त्यांच्या क्र. सी/कार्या-२/२अ/जमिन/कावि-५६/०९, दि. २५/६/२००९ च्या पत्रास अनुलक्षून विशतिपूर्वक कळविण्यात येते की, मौजे मुलुंड, ता. कुर्ला, नभूक्र ६७६/अ व ६७६/३, क्षेत्र १७०८ चौ. मी.( शिधावाटप कार्यालयाच्या ताब्यात असलेल्या ८५८ चौ. मी. क्षेत्रासह) वितरणासाठी उपलब्ध असलेला भूखंड आदित्य सहकारी गृहनिर्माण संस्थेस देण्याबाबत दि. १७/१२/२००८ रोजी हेतूपत्र देण्यात आले आहे. संस्थेस सदर भूखंड अतिमरित्या मंजूर करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्या अनुषंगाने मौजे मुलुंड, ता. कुर्ला, नभूक्र ६७६/अ व ६७६/ब येथील शिधावाटप कार्यालयाच्या ताब्यात असलेल्या ८५८ चौ. मी. क्षेत्रासह वितरणासाठी उपलब्ध असलेला १७०८ चौ. मी. क्षेत्राचा भूखंड, त्यापैकी २५८ चौ. मी. क्षेत्राची इमारत संस्थेने स्वखर्चाने बांधून देणे व २२२ चौ. मी. इतके क्षेत्र शिधावाटप कार्यालय क्रमांक ३५-ई, मुलुंड यांना विनाअट हस्तांतरीत करण्याबाबत हमीपत्र देण्याच्या अटीवर आदित्य सहकारी गृहनिर्माण संस्थेस सोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये नमुद केलेल्या एकुण १६ सभासदांच्या उत्पन्न गटानुसार अनुज्ञेय चटईक्षेत्राप्रमाणे निवासाची व्यवस्था करण्याकरीता शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक-एलसीएस-०६०६/प्र.क्र. ५४/ज-१, दिनांक २५/५/२००७ व शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांक- जमीन-१०/२००३/प्र.क्र. ४०१/ज-१, दिनांक २५/५/२००७ च्या धोरणात्मक आदेशातील व शासनाने याबाबत वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशातील अटी/शर्तीनुसार उक्त जमिनीची सदर आदेशाच्या तारखेस असलेल्या शिघ्रसिध्दगणकानुसार होणा-या मुल्यांकनाच्या सुधारीत कार्यपध्दतीनुसार येणा-या किंमतीच्या दराप्रमाणे सभासदांच्या उत्पन्न गटनिहाय सवलतीची किंमत संस्थेकडून वसूल करुन घेवून पुढे नमुद केलेल्या अतिरिक्त अटीवर तसेच नेहमीच्या अटी/शर्तींवर व जिल्हाधिकारी यांना योग्य वाटतील अशा अटी/शर्तींवर जमीन अतिमरित्या मंजूर करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. तसेच सोबतच्या परिशिष्ट "ब" मध्ये दोन सभासदांची पात्रता प्रचलित नियमानुसार तपासून त्यांच्या सभासदास जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी मान्यता देण्याची कार्यवाही करावी असेही निदेश देण्यात येत आहेत.

**अटी :-** १) सोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये नमुद केलेल्या सभासदांनी त्यांच्या नावा समोर दर्शविल्यानुसार कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतरच त्यांच्या सभासदत्वास मान्यता देण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी कार्यवाही करावी.

G:\Swami Samartha\ Borivali.bap

Scanned by CamScanner

२) संस्थेने वर नमुद केल्यानुसार अटी/शर्ती मान्य असल्याबाबतचे संस्थेच्या नवीन मुख्य प्रवर्तकांकडून रुपये २००/- इतक्या मुद्रांक पेपरवर हमीपत्र सादर करणे संस्थेवर बंधनकारक राहील. त्यानंतरच जिल्हाधिकारी यांनी संस्थेस जमिनीचा ताबा देण्याची कार्यवाही करावी.

३) संस्थेस जमिनीचा ताबा देण्यापुर्वी संस्थेने संस्था नोंदणीकृत करावी.

४) संस्थेस यापुर्वी हेतूपत्र देण्यात आलेल्या पत्र क्रमांक एलसीएस-२६०७/६६४/प्र.क्र. १६१/ज-३, दिनांक १७/१२/२००८ मध्ये दिलेल्या अटी/शर्ती व त्यासोबतच्या जोडपत्र "अ" "ब" "क" "ड" व "इ" मध्ये दिलेल्या अटी/शर्ती संस्थेवर बंधनकारक राहतील व अशा अटी/शर्ती संस्थेस मान्य असल्याबाबत संस्थेने लेखी हमीपत्र द्यावे.

५) सदर जमीन विकसित करत.ना आरक्षण क्षेत्राच्या ४०% बांधकाम शासकीय कार्यालयासाठी करुन संबंधित विभागास हस्तांतरीत करणे आवश्यक आहे व त्यानंतर उर्वरीत ६०% क्षेत्रावर संपूर्ण जमिनीचा अनुज्ञेय चटईक्षेत्र निर्देशांक संस्थेस वापरता येईल त्याकरीता संस्थेने बृहन्मुंबई महानगरपालिकेची मान्यता घ्यावी.

६) सदर जमीन अर्जदार संस्थेस नियंत्रीत सत्ता प्रकार भोगवटादार वर्ग-२ म्हणून प्रदान करण्यात यावी.

७) सहकारी गृहनिर्माण संस्थांना जमीन वितरणा संदर्भातील शासन निर्णय, दिनांक २५/५/२००७ व दिनांक २५/७/२००७ मधील तरतुदी संस्थेवर बंधनकारक असतील.

८) सदर जागेचा मंजूर प्रयोजनाव्यतिरिक्त अन्य प्रयोजनासाठी वापर करता येणार नाही.

९) संस्थेने सदर जागेचा विकास महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावली १९९१ मधील तरतुदीनुसार करणे संस्थेवर बंधनकारक राहील. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पूर्वमान्यतेने बांधकाम करण्यात यावे.

१०) यासदर्भात जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर हे ठरवितील त्या अटी/शर्ती संस्थेवर बंधनकारक राहतील.

२. हे ज्ञापन वित्त विभागाच्या सहमतीने त्यांचा अनौपचारिक संदर्भ क्र.२४२/०९/व्यय-९, दि.५/०८/२००९ ला अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(सही)

( वै. भू. लटके )
अवर सचिव
महसूल व वन विभाग

प्रति,
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा,
प्रशासकीय इमारत,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.

G-Swami Samartha- Borivali.lwp

Scanned by CamScanner

प्रतिलिपी :-

1) आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
2) महालेखापाल (लेखा परीक्षा) १/२, महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
3) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १/२, महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
4) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
5) उपसंचालक, भूमी अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई.
6) सहाय्यक संचालक, नगररचना व मूल्यनिर्धारण, मुंबई उपनगर जिल्हा.
7) वित्त विभाग (व्यय-१), मंत्रालय, मुंबई.
8) मुख्य प्रवर्तक, आदिवासी सहकारी गृहनिर्माण संस्था
9) ज-३ कार्यासन (निवड नस्ती) महसूल व वन विभाग.



Scanned by CamScanner

**शासन ज्ञापन क्रमांक एलसीएस-२६०५/६६४/प्र.क्र. १६१/ज-३, दिनांक १८.३.२०१० चे परिशिष्ट "अ"**

| अ.क्र. | सभासदाचे नांव | प्रवर्ग | पात्रता |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | हेतुपत्रातील मूळ सभासद | | |
| १ | श्री. रमेश अनंत घोगले | खुला | श्री. घोगले यांनी शासकीय कर्मचारी असल्याचा पुरावा सादर केलेला नाही. तसेच निवासाबाबत भाडेपावती किंवा भाडेकरारची प्रत सादर केलेली नाही. त्यामुळे अपात्र |
| २ | श्री. मंगेश पी. कांबळी | खुला | पात्र |
| ३ | श्री. संतोष एम. पेडणेकर | खुला | सक्षम प्राधिका-याचा उत्पन्नाचा दाखला सादर करण्याच्या अटीवर पात्र |
| ४ | श्री. वसंत एम. जाधव | खुला | पात्र |
| ५ | श्री. सखाराम डी. लांबे | खुला | श्री. लांबे यांनी शासकीय कर्मचारी असल्याचा पुरावा सादर केलेला नाही. तसेच निवासाबाबत भाडेपावती किंवा भाडेकरारची प्रत सादर केलेली नाही. तसेच महाराष्ट्र राज्यातील १५ वर्षे वास्तव्याचा पुरावा सादर केलेला नाही. त्यामुळे अपात्र |
| ६ | श्री. रविंद्र दत्ताराम खरात | मागासवर्गीय | सक्षम प्राधिका-याचा उत्पन्नाचा दाखला सादर करण्याच्या अटीवर पात्र |
| ७ | श्री. संतोष एस. गवई | मागासवर्गीय | त्यांचे निवास स्वतःचे किंवा कुटुंबियांचे नांवे नसल्याबाबत पुरावा सादर करण्याच्या अटीवर तसेच सक्षम प्राधिका-याचा उत्पन्नाचा दाखला सादर करण्याच्या अटीवर पात्र |
| ८ | श्री. संदिप बी. सावडेकर | मागासवर्गीय | पात्र |
| ९ | श्री. राजेश आर. राजगुरु | खुला | महाराष्ट्र राज्यातील १५ वर्षे वास्तव्याच्या पुरावा सादर करण्याच्या अटीवर पात्र. |
| | नवीन सभासद | | |
| १० | श्री. दिपक रामचंद्र मोरे | खुला | पात्र |
| ११ | श्री. नितीन मोहन मार्इंत | खुला | पात्र |
| १२ | श्री. विनय व्ही. शेगले | खुला | पात्र |
| १३ | श्री. नित्यानंद टी. नाडार | खुला (अपंग सभासद) | पात्र |
| १४ | श्री. जयदिप वसंत राऊत | खुला | पात्र |
| १५ | श्री. विनित विजय कुडतरकर | खुला | पात्र |
| १६ | कु. श्रुजन जे घरत | खुला | पात्र |
| १७ | कु. निर्मतिनी सुहास चिरकर | खुला | पात्र |
| १८ | कु. पुनम भगवान शिंदे | मागासवर्गीय | पात्र |

(वै. भू. लटके)
अवर सचिव
महसूल व वन विभाग.

G-Swami Samartha- Borivali.lwp

Scanned by CamScanner

शासन ज्ञापन क्रमांक एलसीएस-२६०७/६६४/प्र.क्र. १६१/ज-३, दिनांक १८.३.२०१० चे परिशिष्ट "ब"

| अ.क्र. | सभासदाचे नांव | प्रवर्ग | पात्रता |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्री. कुलदीप बाबूराव गायकवाड | -- | -- |
| २ | श्री. विजयसिंह प्रतापराव पवार | -- | -- |

( वै. भू. लटके )
अवर सचिव
महसूल व वन विभाग.

Scanned by CamScanner

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय (५९)

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, शासकीय वसाहत, बांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
ध्वनी : ६५५ ६७११, ६५५ ०१११ फॅक्स : ६५५ ६८०५ E mail - collrmsd@yahoo.com

क्रमांक : सी/कार्या-२/२अ/जमिन/कावि २४३/१०
दिनांक : /७/२०१०

**वाचले :**

१) आदित्य सहकारी गृहनिर्माण संस्था यांचा दिनांक २५/४/०६ रोजीचा अर्ज
२) तहसिलदार कुर्ला यांचा दिनांक ३०/११/२००६ रोजीचा अहवाल
३) नगर भूमापन अधिकारी,मुलुंड यांचा दिनांक २६/२/०७ व दिनांक २५/८/०८ रोजीचा अहवाल
४) जिल्हाधिकारी,मु.उ.जि. बांद्रा यांनी शासनास सादर केलेला क्र.सी/कार्या २/२अ/जमिन/कावि ८३८/०६ दिनांक ११/६/२००७ व क्र सी/कार्या २/२अ/जमिन/कावि ३४२/०८ दिनांक २०/९/०८ रोजीचा अहवाल.
५) शासन महसूल व वन विभाग,मंत्रालय यांचे क्र एलसीएस २६४७/६६४/प्र.क्र.१६१/ज.३ दिनांक १८ मार्च २०१० रोजीचे आदेश.

**आदेश :**

मौजे मुलुंड, तालुका कुर्ला येथील नभूक्र ६७६/अ व ६७६/३ क्षेत्र १७०८ चौ.मी. (शिधा वाटप कार्यालयाच्या ताब्यात असलेल्या ८५८ चौ.मी. क्षेत्रासह ) वितरणासाठी उपलब्ध असलेला भूखंड आदित्य सहकारी गृहनिर्माण संस्थेस देण्याबाबत शासनाने दिनांक १७/१२/२००८ रोजी हेतूपत्र देण्यात आले होते. संस्थेस सदर भूखंड अंतिम रित्या मंजूर करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्या अनुषंगाने मौजे मुलुंड, तालुका कुर्ला येथील नभूक्र ६७६/अ व ६७६/व येथील शिधावाटप कार्यालयाच्या ताब्यात असलेला ८५८ चौ.मी. क्षेत्रासह वितरणासाठी उपलब्ध असलेला १७०८ चौ.मी. क्षेत्राचा भूखंड शासनाने अटी/शर्ती नमूद करुन वर उपदघातात नमूद क्र ५ अन्वये मंजूर केलेला आहे.

वरील भूखंड आदित्य सहकारी गृहनिर्माण संस्थेमधील एकूण मान्यता प्राप्त सभासदांच्या उत्पन्न गटानुसार अनुज्ञेय चटई क्षेत्रप्रमाणे निवासाची व्यवस्था करणेकरिता शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र एलसीएस ०६०६/प्र.क्र.५४/ज १ दिनांक २५/५/२००७ व शासन निर्णय,महसूल व वन विभाग क्र जमिन-१०/२००३/प्र.क्र ४०१/ज-१ दिनांक २५/७/२००७ च्या धोरणात्मक आदेशातील व शासनाने याबाबत वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशातील अटी/शर्तीनुसार उक्त जमिनीची सदर आदेशाच्या तारखेस असलेल्या शिघ्रसिध्दगणकानुसार होणाऱ्या मूल्यांकनाच्या सुधारीत कार्यपध्दतीनुसार येणाऱ्या किंमतीच्या दराप्रमाणे सभासदांच्या उत्पन्न गटनिहाय सवलतीची किंमत संस्थेकडून वसूल करुन खालील अतिरिक्त अटीवर अंतिम रित्या जागा मंजूर करणेत येत आहे.

**अटी:**

१) संस्थेस वरील जागेची शिघ्रसिध्द गणकानुसार होणारी सवलतीची समरस २०% प्रमाणे जागेची कब्जाहक्काची रक्कम रु ९२,२३,२००/- ( अक्षरी रु ब्याण्णव लाख, तेवीस हजार दोनशे मात्र) तात्काळ भरणेकरिता दिनांक २५/३/२००७ रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे. त्याप्रमाणे संस्थेने प्रथम रक्कम रु ३०,००,०००/- (अक्षरी रु तीस लक्ष मात्र) रक्कम शासन भरणा केली आहे. उर्वरीत रक्कम रुपये ६२,२३,२००/- (अक्षरी रु. बासष्ट लक्ष तेवीस लाख दोनशे मात्र ) रक्कम संस्थेने या कार्यालयात दिनांक ४/७/२०१० रोजी शासन भरणा करुन वरील संपूर्ण कब्जाहक्काची रक्कम संस्थेने शासनाने अदा केलेली आहे.



Scanned by CamScanner

२) शिधावाटप कार्यालयाच्या ताब्यात असलेल्या ८५८ चौ.मी.क्षेत्रासह वितरणांसाठी उपलब्ध असलेला १७०८ चौ.मी. क्षेत्राचा भूखंड त्यापैकी २७८ चौ.मी.क्षेत्राची इमारत संस्थेने स्वखर्चाने बांधून दउेणे व २२२चौ.मी. इतके क्षेत्र शिधावाटप कार्यालय क्र ३५ई मुलुंड यांना विनाशुल्क हस्तांतरीत करणेकरिता, संस्थेने प्रथम रु.२००/- च्या मुद्रांक पेपरवर हमीपत्र सादर करावे.

३) संस्थेस यापूर्वी हेतूपत्र देण्यांत आलेल्या पत्र क्र एलसीएस २६०७/६६४/प्र.क्र.१६१/जी ३ दिनांक १७/१२/२००८ मध्ये दिलेल्या अटी/शर्ती व त्यासोबतच्या जोडपत्र अ,ब,क,ड व इ मध्ये दिलेल्या अटी/शर्ती संस्थेवर बंधनकारक असून तसे लेखी हमीपत्र संस्थेने सादर करावे.

४) सदर जमिन विकसित करताना आरक्षण क्षेत्राच्या ४०% बांधकाम शासकीय कार्यालयासाठी करुन सबंधित विभागात हस्तांतरीत करणे आवश्यक आहे व त्यानंतर उर्वरित ६०% क्षेत्रावर संपूर्ण जमिनीचा अनुज्ञेय चटईक्षेत्र निर्देशांक संस्थेस वापरता येईल त्याकरिता संस्थेने बृहन्मुंबई महानगरपालिकेची मान्यता घ्यावी.

५) संस्थेमधील एकूण १२ सभासदांना त्यांच्या उत्पन्न गटानुसार पात्रता तपासून मान्यता देणेत येत आहे. अनुज्ञेय चटई क्षेत्रानुसार सभासदांना सदनिका वितरीत करुन यामधील सभासद जिल्हाधिकारी यांचे पूर्व परवानगी शिवाय फेरबदल /हस्तांतर करता येणार नाही.

६) सदर जागेचा मंजूर प्रयोजनाव्यतिरिक्त अन्य प्रयोजनासाठी वापर करता येणार नाही.

७) संस्थेचे सदर जागेचा विकास महानगर पालिकेच्याम जूर विकास नियंत्रण नियमावली १९९१ मधील तरतूदीनुसार करणे संस्थेवर बंधनकारक राहिल. प्रदान केलेल्या शासकीय जागेवर टीडीआर लोड करणेपूर्वी शासन पूर्व परवानगी घेणे संस्थेवर बंधनकारक राहील.

८) सदर जमिन अर्जदार संस्थेस नियंत्रित सत्त प्रकार भोगवटादार वर्ग २ म्हणून प्रदान करणेत आलेली आहे.

९) संस्थेमधील एकूण सभासदांपैकी ३% अपंग/अंध व २०% मागासवर्गीय सभासदांची संख्या कायम राहिल.

१०) सहकारी गृहनिर्माण संस्थांना जमिन वितरणा संदर्भात शासन निर्णय दिनांक २५/५/२००७ व दिनांक २५/७/२००७ मधील सर्व तरतूदी संस्थेवर बंधनकारक असून तसा लेखी करारनामा संस्थेने रु २००/- च्या मुद्रांक पेपरवर सादर करावा.

वरील आदेश हे शासन,वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र २४२/०९/व्यय ९ दिनांक ५/८/२००९ ला अनुलक्षून शासनाने निर्गमित केलेले आहे.

उप जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा

ते,
सेक्रेटरी
आदित्य सहकारी गृहनिर्माण संस्था
सर्व्हे क्र ६७६ अ व ६७६/३
मुलुंड (प.)मुंबई ४०००८१

प्रतिलीपी:

१) अवर सचिव (ज.३) महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई ३२ यांस माहितीकरिता सादर.



Scanned by CamScanner

(५८३)

२) मा.आयुक्त कोकण विभाग,कोकण भवन नवी मुंबई यांस माहितीकरिता सादर
३) उपनियत्रंक,शिधावाटप कार्यालय क्र ३५३,मुलुंड मुंबई ८० यांजकडे माहितीकरिता व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी

२/-त्यांना सदर आदेशातील अट क्र २ प्रमाणे प्रथम जागेचा ताबा घेऊन नंतर तसे हमीपत्र तयार करुन घेऊन ते या कार्यालयात तात्काळ सादर करावे.

४) तहसिलदार कुर्ला,मुलुंड
५) नगर भूमापन अधिकारी मुलुंड यांस
६) २/- सदर आदेशाप्रमाणे वरील शासकीय जागेचा संयुक्तिक ताबा संस्थेस देऊन त्याप्रमाणे संबंधित शासन मिळकतीचे ७/१२ व मिळकत पत्रिकेत संस्थेचे नांव दाखल करावे व तसा सुधारीत मिळकत पत्रिका,७/१२ ,ताबा पावती व नकाशाच्या चार प्रतीसह या कार्यालयात सादर करावी.

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा



Scanned by CamScanner